—: प्रेसनोट :— दि. ३०/०९/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ४०/२०२१ |
| कलम | ७ भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | कृष्णा मारुती पवार, वय ५१ वर्षे, धंदा — नोकरी, पदनाम — इमारत मुकादम, बृहन्मुंबई महानगरपालीका, 'सी' वार्ड कार्यालय, ७६ श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी, मरीन लाईन (पुर्व) मुंबई ४००००२. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ४५,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ४५,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी राहत असलेल्या ठिकाणी ईस्माईल कर्टे रोड, पोगारी मोहल्ला, मुंबई येथे त्यांच्या जमातीची जागा असून तेथे त्यांनी दोन मजली बांधकाम केले होते. त्याचे टॅरेसवर पत्राचे शेड बांधण्यात आले होते. महानगरपालीका सी वार्ड येथून फिर्यादी यांना सदरचे बांधकाम अनाधिकृत असल्याची नोटीस देण्यात आली होती. सदरचे बांधकाम अनाधिकृत असल्याचे सांगून त्यावर कारवाई करायची नसल्यास ५०,०००/— रु. दयावे लागतील असे आरोपी लोकसेवक कृष्णा पवार यांचेकडून फिर्यादी यांना सांगण्यात आले होते. परंतू फिर्यादीस लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ३०/०९/२०२१ रोजी ला.प्र.वि., मुंबई कार्यालयात येवून तक्रार दिली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ३०/०९/२०२१ रोजी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक कृष्णा मारुती पवार याने फिर्यादी यांचे कडे ५०,०००/— रु. लाचेची मागणी करुन तडजोडअंती ४५,०००/— रु. लाच स्विकारण्याची तयारी दर्शवली.<br>त्यानुसार दिनांक ३०/०९/२०२१ रोजी सापळा कारवाईच्या दरम्यान आरोपी लोकसेवक कृष्णा मारुती पवार यास फिर्यादी कडून ४५,०००/— रु. लाच रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले.<br>सदरबाबत आरोपी लोकसेवक कृष्णा मारुती पवार यांचे विरुध्द ला.प्र.वि, मुंबई येथे गु.र.क्र. ४०/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येत आहे. |

( अरुण घोडके )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १) acbwebmail@mahapolice.gov.in
२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४
दुरध्वनीक्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००